साप्ताहिक

POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी  एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ४९ ● मंगळवार, दि. २२ ते २९ एप्रिल २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू


## मोदींच्या मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होणार?

### महाराष्ट्रातून कुणाची लागणार केंद्रात वर्णी

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील नवीन चेहऱ्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते, असे विश्वसनीय वृत्त आहे. त्याचबरोबर भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवडही एप्रिलच्या अखेरीस होऊ शकते, असेही सूत्रांनी सांगितले आहे.

महाराष्ट्रातून शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केंद्रीय मंत्रिपदासाठी उत्सुक आहे, त्यामुळे मोदींच्या मंत्रिमंडळात यापैकी कोणत्या पक्षातील नेत्याची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. लोकसभेपाठोपाठ तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुका जिंकून विजयाच्या गतीवर स्वार झालेल्या भाजपाने आता बिहारच्या निवडणुकीवर आपले लक्ष केंद्रित केले आहे.

## कृत्रिम वाळूचे धोरण लवकरच

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती



**नागपूर :** रेतीबाबत राज्यात अनेक तक्रारी आहेत. नियमानूसार रेती डेपो चालत नसतील तर त्यांचे परवाने रद्द केले जातील. नदीच्या वाळूवर गरज राहणार नाही, कृत्रिम वाळू तयार करू, जे बदमाशी आता डेपोवर होते आहे ती बदमाशी चालू देणार नाही, आम्ही संपूर्ण रिपोर्ट मागवणारआहे. तसेच कृत्रिम वाळूचे धोरण लवकरच आणणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

वाळूबाबत राज्यातील संपूर्ण जिल्ह्यात तक्रारी आहेत. राज्यातील प्रत्येक डेपोला मी नोटीस इशू केली आहे, ५७ डेपोला नोटीस, डेपो चालवण्याची कार्यपद्धती आहे, त्या पद्धतीने डेपो चालवत नाही, प्रत्येकाचा वेगवेगळा रिपोर्ट तयार करून विभागीय आयुक्ताने पुढच्या तीन दिवसात शासनाकडे पाठवावा, अशा सूचना केल्या आहेत. जे नियमानुसार डेपो चालवत नाही त्यांचे लायसन्स रद्द केले जातील, नवीन वाळू पॉलिसी आली आहे आणि येणाऱ्या कॅबिनेटमध्ये लवकरच 'एम सॅन्ड' वाळूचे धोरण अंतर्गत कृत्रिम वाळू तयार करण्याचा धोरण आणणार आहोत, प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रेशर आणतोय, असे त्यांनी सांगितले.

## ना. गडकरी यांनी दिली जिल्हयाला अत्याधुनिक सुविधायुक्त रूग्णवाहिका

वाशीम : सामाजिक कार्यात अग्रसेर असलेल्या स्वामी विवेकानंद शिक्षण व व्यायाम प्रसारक मंडळ धनज बु. संस्थेला मातोश्री वैकुंठधाम निवासी स्व. सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी यांच्या स्मृतीपित्यर्थ वाशीम जिल्हयातील रूग्ण सेवेकरीता केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांनी अत्याधुनिक सुविधायुक्त एमजी हेक्टर रूग्णवाहिका संस्थेचे अध्यक्ष निलेश सोमाणी व टिमला शनिवार १९ एप्रिल रोजी त्यांच्या शुभहस्ते प्रदान केली.

वाशीम जिल्हयातील रूग्णांना यामुळे मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. लवकरच ही रूग्णवाहिका जनसेवेत समर्पित करण्यात येणार आहे. नागपूर येथे केंद्रीय मंत्री ना. गडकरी यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या कार्यक्रमाला समाजसेवी पुनमचंद सोमाणी, राजेश सोमाणी, श्याम सोमाणी, तेजस सोमाणी, संस्थेचे सचिव श्याम सवाई, ॲड. सुरेश टेकाळे, शेलूबाजार अर्बन बँकेचे अध्यक्ष मोहित कर्नावट, विकास बारड, दिप क सोनोने, महादेव लांडकर आदिंची उपस्थिती होती. यावेळी गडकरी यांनी रूग्ण व मानवसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.



### ■ स्वामी विवेकानंद शिक्षण व व्यायाम प्रसारक मंडळाचा पुढाकार

सामाजिक कार्यकर्ते सोमाणी यांच्या कार्याची प्रशंसा करीत त्यांनी आता रूग्णसेवेत रूग्णवाहिकेच्या माध्यमातून कार्य करण्यासाठी शुभेच्छा दिल्यात.

सदर रूग्णवाहिकेची चाबी भाजपा संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर, मंडलेकर साहेब व धन्वतरी आयुर्वेद व पंचकर्मचे संचालक डॉ. श्रीरंग यांनी संस्थेचे अध्यक्ष पत्रकार निलेश सोमाणी यांना प्रदान करण्यात आली.

## सुप्रसिद्ध कवी संजीव यांचे स्मारक व्हावे

### कल्याण जाधव; संजीव यांच्या १११ व्या जन्मदिनी काव्यसंमेलन

अखेरचा हा तुला दंडवत, चाळ माझ्या पायात, अत्तराचा फाया, सोनियाच्या ताटी, अशी अनेक सरस तथा अवीट गोडीची कर्णमधुर गीते लिहिणारे कै. कृष्ण गंगाधर दीक्षित ऊर्फ कवी संजीव यांचे यथोचित स्मारक उभारावे, यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते कल्याण जाधव यांनी व्यक्त केले. ख्यातनाम कवी संजीव यांच्या १११ व्या जन्मदिनानिमित्त आयोजित केलेल्या कवी संमेलनात जाधव यांनी हे मत व्यक्त केले. या महान कवीच्या गाण्यांनी एके काळी अवघा महाराष्ट्र गाजवला होता. दिवाळीच्या दिवशी तर ओवाळीते भाऊराया हे गाणे घराघरांत प्रत्येक बहिणीच्या तोंडी असायचे. कवी संजीव यांचा आदर्श प्रत्येक कवी मनाच्या साहित्यिकाने बाळगायला हवा, असे कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून मांडले, कवी संजीव यांचे ज्येष्ठ चिरंजीव डॉ. शंतनू दीक्षित आणि स्नुषा डॉ. शुभदा दीक्षित विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. दीक्षित यांनी कवी संजीव याचा संपूर्ण जीवन प्रवास श्रोत्यांना उलगडून सांगितला, कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ साहित्यिक बबन पोतदार यांनी आणि कवी संजय वेदपाठक यांनी केले. प्रास्ताविकात बोलताना पोतदार यांनी संजीवांच्या पडला पदर खांदा तुझा दिसतो, सख्या मी करते वेणीफणी, मल्हारी माझा मल्हारी, निळया आभाळी कातरवेळी, असा कसा खट्याळ तुझा कान्हा, चाळ माझ्या पायात पाय माझे तालात, सामिन्दरा माझ्या सामिन्दरा इत्यादी लोकप्रिय लावण्यांची आठवण करून दिली. कवी संजय वेदपाठक यांनी मनोगत व्यक्त केले. गीता मांढरे यांनी सूत्रसंचालन केले. भरत सुरसे यांनी आभार प्रदर्शन केले.

### ■ कवयित्री अंजली कुलकर्णी यांचे अध्यक्षीय भाषण

## वाकद येथील प्रयोगशील शेतकरी कुंदनसिंह ठाकुर व विलास मोरे ठरले जलताराचे दूत

रिसोड - श्री कुंदनसिंह प्रेमसिंह ठाकूर व श्री लखनसिंह ठाकूर संतोषसिंह ठाकुर व विलास पांडुरंग मोरे यांचा समावेश यांनी मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस यांच्या संकल्पनेतून तयार झालेला ड्रीम प्रोजेक्ट ला जिल्ह्यामध्ये चालना देण्याकरिता आपल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांनी पाणीटंचाई, पाणी समस्या, दुष्काळ यावर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जमिनीत पाण्याचा संचय करणे पाण्याचे पुनर्भरण करणे यासाठी वाशिम जिल्ह्यामध्ये जलतारा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे

त्याचाच एक भाग म्हणून माननीय उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर मॅडम व रिसोडच्या माननीय तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाकद येथील मंडळ अधिकारी श्री ए व्ही लहाने व तलाठी श्री जी जी गरकळ व तलाठी श्री अक्षय जाधव यांनी मागील काही दिवसापासून सतत पाठपुरावा करून वाकद येथील शेतकऱ्यांना स्वखर्चातून स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन आपल्या शेतामध्ये जलतारा योजनाचा लाभ घेण्यासाठी प्रेरित केले त्याचाच एक भाग म्हणून आज वाकद येथील प्रगतशील शेतकरी श्री कुंदनसिंह प्रेमसिंह ठाकूर व लखनसिंह ठाकूर संतोष सिंह ठाकुर व विलास पांडुरंग मोरे यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या वाकद येथिल शेतजमिनीमध्ये जलताराचे २२ खड्डे पूर्ण केले असून अजूनही उर्वरित ज माननीय जिल्हाधिकारी वाशिम, माननीय उपविभागीय अधिकारी वाशिम यांनी जलतारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे

या प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्याना आपल्या शेतात एकूण एका एकरासाठी एक याप्रमाणे उताराच्या दिशेने शेतात ज्या ठिकाणी पाणी साचते अशा ठिकाणी पाच बाय पाच फूट लांबी रुंदी व सहा फूट खोली असलेले खड्डे खोदकाम करून त्यामध्ये मोठे मध्यम व छोट्या आकाराचे दगड भरून हे खड्डे भरून

### ■ वाकद येथील एकाच शेतकरी कुटुंबाने केले २२ जलतारा गड्डे

घ्यावे आणि त्यामुळे पावसाळ्यात पावसाचे वाहणारे व गाळ वाहून नेणारे पाणी अशा ठिकाणी थोपून ते जमिनीमध्ये जिरवले जाईल यामधून पाणी अडवा पाणी जिरवा संकल्पना पूर्णत्वास जाईल.

जल है तो कल है असे आपण म्हणतो परंतु खरे म्हणजे अशाप्रकारे ग्रामपातळीवर प्रत्यक्ष शेतकऱ्यांसोबत हात मिळवणी केल्याशिवाय शासनाचे हे काम पूर्णत्वास जाणार नाही आपल्या राज्याचे सिंचनाचे शिल्पकार विकास पुरुष कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सुरुवात केलेला स्तुत्य उपक्रम या योजनेमध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांना ज्यांच्याकडे जॉब कार्ड आहे किंवा जे इतर जॉब कार्ड धारकामार्फत काम करून घेऊ इच्छितात त्यांच्यासाठी जवळपास ५००० रुपयांपर्यंतचे अनुदान रोजगार हमी योजनेअंतर्गत देय आहे तरी जास्तीत जास्त




शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा . तसेच आपल्या गावातील व आपल्या परिसरातील मोठ्या शेतकऱ्यांनी हाच आदर्श घेऊन स्वयंस्फूर्तीने व स्वखर्चाने आपल्या शेतात जलतारांची निर्मिती करावी जेणेकरून भविष्यात सिंचनातून प्रगतीकडे प्रत्येक शेतकरी हा जायला पाहिजे व प्रत्येक शेतकऱ्याला जलतारा योजनेचा फायदा व्हायला पाहिजे त्याकरिता सर्वांनी आपल्या आपल्या शेतामध्ये ही योजना राबवावी व जिल्ह्यातील शेतकऱ्यांना यापासून प्रेरणा मिळावी हाच उद्धात हेतू समोर ठेवून आज जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे जिल्हाधिकारी एस भुनेश्वरी महोदया उपजिल्हाधिकारी घुगे , एस डी ओ वैशाली देवकर मॅडम साहेब तथा तालुका दंडाधिकारी प्रतीक्षा तेजनकर मॅडम यांच्या हस्ते श्री कुंदनसिंह ठाकूर व विलास मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

# रेबिजचे गंभीर आव्हान

पत्रकारितेच्या अभ्यासक्रमांमध्ये 'कुत्रा माणसाला चावला तर ती बातमी नाही परंतु माणूस कुत्र्याला चावला तर ती बातमी आहे' असे शिकवले जाते. यातील मतितार्थ बाजूला ठेवला तरी कुत्रा नावाचा वर्षानुवर्षांपासूनचा मानवाचा प्रामाणिक मित्र असणारा प्राणी चावा घेणे या त्याच्या स्वभाववैशिष्ट्यासाठी प्रसिद्ध आहे. भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या कैक घटना बहुतेकांनी पाहिलेल्या आहेत. भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना अलीकडील काळात झपाट्याने वाढत आहेत. २०१२ मधील पशुधन जनगणनेनुसार भारतात सुमारे १.७ कोटी भटके कुत्रे होते, परंतु २०१९ पर्यंत ही संख्या वाढून तब्बल ६.२ कोटींवर पोहोचली. कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारची एबीसी म्हणजेच ॲनिमल बाइट सेंटर योजना अस्तित्वात आहे. पण तिच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत ठणठणाट आहे. दरवर्षी भारतात १.७५ कोटींहून अधिक लोक कुत्र्यांच्या हल्ल्यांना बळी पडतात. भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याने 'रेबिज' हा घातक आणि विषाणूजन्य आजार होण्याची शक्यता असते. रेबीज हा जगातील सर्वात घातक आजारांपैकी एक मानला जातो. रेबीज विषाणू शरीरात प्रवेश केल्यानंतर मध्य मज्जासंस्थेकडे हळूहळू प्रवास करतो. लक्षणे दिसण्यास २ आठवड्यांपासून ३ महिन्यांपर्यंत कालावधी लागू शकतो. प्रारंभी थकवा, ताप, चावलेल्या जागी झिणझिण्या किंवा जळजळ यासारखी लक्षणे दिसतात. पुढे रोगाची प्रगती होत गेल्यास भीती वाटणे, गोंधळ, पाण्याची भीती, आवाजाने चिडचिड, झटके येणे अशी लक्षणे जाणवत रुग्ण शेवटी कोमात जाऊन मरण पावतो. जगात रेबिजमुळे होणार्या एकूण मृत्यूंपैकी ३६ टक्के मृत्यू एकट्या भारतात होतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, दरवर्षी भारतात २० हजारांहून अधिक लोक रेबीजमुळे मृत्यूमुखी पडतात. विशेष म्हणजे, या मृत्यूंपैकी ९९ टक्के प्रकरणांमध्ये कुत्र्यांच्या चावण्यामुळे रेबीजचा प्रसार झालेला असतो. २०२२ साली देशात २१ जणांचा रेबीजमुळे मृत्यू झाला होता. मात्र २०२४ मध्ये ही संख्या २.५ पट वाढून ५४ वर पोहोचली आहे. यातील सर्वाधिक १४ मृत्यू हे महाराष्ट्रातील होते. विशेष म्हणजे, २०२२ पासून सलग तिसर्या वर्षी महाराष्ट्र हे रेबीजमुळे सर्वाधिक मृत्यू होणारे राज्य ठरले. २०२२ साली देशभरात कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या २१.८० लाख घटना नोंदवण्यात आल्या होत्या. २०२३ साली हा आकडा ३०.४३ लाखावर पोहोचला होता. २०२४ मध्ये ही संख्या २२ लाख इतकी होती. रेबीजचे उच्च प्रमाण हे भटक्या प्राण्यांचे नियंत्रण न होणे, लसीकरणाचा अभाव आणि सामान्य जनतेमध्ये जागरूकतेचा अभाव यामुळे होते. रेबीजवर कोणतेही औषध उपलब्ध नाही. याचा एकमेव उपाय म्हणजे लसीकरण आणि जनावरांच्या संख्येवर नियंत्रण. मात्र, भारतातील ८० टक्क्यांहून अधिक भटक्या कुत्र्यांचे लसीकरण झालेलेच नसते. त्यामुळे संसर्गाचा धोका अधिक वाढतो. शहरी व ग्रामीण भागात कुत्र्यांच्या चावण्याच्या घटनांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. लहान मुले आणि वृद्ध यांना या समस्येचा सर्वाधिक झ्टका बसतो. अनेक प्रकरणांमध्ये कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

# इंग्रजीला पालख्या, हिंदीला विरोध ?

## ▪ देवेंद्र फडणवीस यांचा सवाल
## ▪ नाशिकमध्ये दंगल भडकवण्याचा सुनियोजित प्रयत्न केल्याचा दावा



**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुन्हा एकदा इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याच्या आपल्या सरकारच्या निर्णयाचे जोरदार समर्थन केले. इंग्रजीला पालख्या व हिंदीला विरोध हा कुठला विचार आहे? असा खडा सवाल त्यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे. यावेळी त्यांनी नाशिक येथील दंगल जाणिवपूर्वक घडवण्यात आल्याचाही दावा केला.

> देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी पुन्हा एकदा हिंदीचे जोरदार समर्थन केले. मी या प्रकरणी परवाच माझी भूमिका स्पष्ट केली आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा अनिवार्य आहे. सर्वांनी मराठी भाषा शिकलीच पाहिजे. त्यासोबत दुसरी एखादी भाषा शिकायची असेल तर ती ही शिकता येते. मला कधीकधी आश्चर्य वाटते की, हिंदीला विरोध व इंग्रजीला का नाही? इंग्रजीला पालख्या व हिंदीला विरोध हा कुठला विचार आहे? त्यामुळे मराठीला कुणी विरोध केला तर आम्ही सहन करणार नाही, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, नाशिक येथे जाणिवपूर्वक दंगल घडवण्याचा प्रयत्न झाला. न्यायालयाच्या निर्णयानंतर तेथील लोकांनी वादग्रस्त अतिक्रमण काढण्याविषयी प्रशासनाला सांगितले. त्यानंतर त्यांनी स्वतःच ते अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. पण त्याचवेळी ही सगळी मंडळी जी दंगलीमध्ये दिसत आहेत, त्यांनी जाणिवपूर्वक दंगल घडवली. त्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई केली जात आहे.

पत्रकारांनी यावेळी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पाणी टंचाईच्या मुद्यावरून सरकारवर केलेली टीका मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा कोण संजय राऊत? असे म्हणत या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर पत्रकारांनी यवतमाळमध्ये पाणी टंचाईने एका १२ वर्षीय मुलीचा बळी घेतल्याचा मुद्दा मुख्यमंत्र्यांपुढे मांडला. त्यावर ते म्हणाले, जिथे टंचाई आहे, तिथे कलेक्टरला अधिकार दिलेत. कलेक्टरनी आपल्या भागात टँकरने पाणी पुरवठा करायचा की तिथे उपलब्ध असणाऱ्या इतर पद्धतीने करायचाय याचा निर्णय घ्यायचा आहे.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना 'डॉक्टरेट'

## कृषी क्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी गौरव



**नागपूर** : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वतीने डॉक्टरेट (डी. एस्सी., डॉक्टर ऑफ सायन्स) प्रदान करण्यात आली. या डॉक्टरेटमुळे ना. गडकरी यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विद्यापीठाच्या वतीने आयोजित २६ व्या दीक्षांत समारोहामध्ये काही अपरिहार्य कारणांमुळे केंद्रीय मंत्री गडकरी यांना उपस्थित राहता आले नव्हते. त्यामुळे शनिवार, १९ एप्रिलला परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. इंद्र मणी यांनी ना. गडकरी यांच्या निवासस्थानी आयोजित अनौपचारिक सोहळ्यात ही डॉक्टरेट प्रदान केली. जल संवर्धन, जैवइंधन विकास, जैविक आणि प्राकृतिक शेती, कृषि विविधीकरण आणि ग्रामीण विकासामध्ये ना. गडकरी यांच्या अमूल्य योगदानासाठी ही डॉक्टरेट प्रदान करण्यात येत असल्याचे विद्यापीठाने म्हटले आहे. यापूर्वी देखील ना. गडकरी यांना महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, आसाम राज्यातील विद्यापीठांनी डॉक्टरेटने गौरविले आहे. यामध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उत्तर प्रदेश येथील गलगोटियाज विद्यापीठ, गुवाहाटी येथील आसाम डाऊन टाऊन विद्यापीठ, गाझियाबाद येथील एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यांचा समावेश आहे.



**बीड** : येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'फिरता नारळी सप्ताह सांगता समारंभात' प्रमुख उपस्थिती दर्शविली. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे स्वागत आयोजकांकडून करण्यात आले.



**चिंचवड** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चिंचवड, पुणे येथे क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचालित 'पुनरुत्थान समरसता गुरुकुलम'ची पहाणी केली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, पद्मश्री गिरीश प्रभुणे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# भूसंपादन मोबदल्याच्या विलंबापोटी बँकांसाठीच्या दरापेक्षा एक टक्के अधिक दराने व्याज

मुंबई - भूसंपादनाचा मोबदला विलंबाने दिल्या गेल्यास आता त्या रकमेवरील व्याज एकाच दराने दिले जाईल. हा व्याज दर बँकांसाठीच्या व्याज दरापेक्षा (रेपो रेट) एक टक्क्यांनी अधिक असेल, त्याबाबतचे विधेयक आणण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. विविध सार्वजनिक, शासकीय, निमशासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्यासाठी उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ स्वीकारला आहे. य

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# पत्रकारांनी निर्भय राहून समाजहितासाठी कार्य करावे - अशोक वानखेडे

**मुंबई, प्रतिनिधी:**

**लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची जबाबदारी पार पाडताना पत्रकारांनी निर्भय आणि निःपक्षपाती राहणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या राजकीय, आर्थिक किंवा सामाजिक दबावाला बळी न पडता सत्य आणि निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून लोकशाही मजबूत करण्यासाठी पत्रकारांनी कार्य करावे, असे मत ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी व्यक्त केले.**

मुंबईत आयोजित विशेष कार्यक्रमात न्यूज १८ चे वरिष्ठ पत्रकार गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. प्रदेश कार्याध्यक्षपदी विदर्भातील सोमानी यांची निवड करण्यात आली.यावेळी राज्यभरातील पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर झाली. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी नवे उपक्रम हाती घेण्याचा निर्धार नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला.

पत्रकारांसाठी नवीन धोरणे आणि उपक्रम,

नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पत्रकार आणि प्रशासन यांच्यातील समन्वय वाढवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कार्यरत राहील. शासनाच्या विविध योजनांचे जिल्हानिहाय सर्वेक्षण करून त्यासंदर्भातील अहवाल प्रकाशित करण्यात येतील, जेणेकरून प्रशासन आणि जनता यांच्यात योग्य समन्वय साधता येईल.

पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती स्थापन,

राज्यात पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांना आळा घालण्यासाठी पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीसाठी पश्चिम महाराष्ट्र विभागासाठी सचिन चपळगावकर आणि कोकण विभागासाठी नवनाथ कापले यांची नेमणूक करण्यात आली.

महिला पत्रकारांसाठी विशेष योजना,

## गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड

### ■ कार्याध्यक्षपदी निलेश सोमाणी, पत्रकारांसाठी नवे उपक्रम आणि धोरणात्मक निर्णय जाहीर!



महिला पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र हेल्पलाइन आणि सुरक्षा यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव पत्रकार संघटनेने मांडला आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील महिला पत्रकारांना अधिक संधी मिळाव्यात, यासाठी विशेष उपक्रम राबवले जाणार आहेत.

पत्रकारांचे कल्याण आणि सुरक्षेसाठी ठोस निर्णय,

संघटनेच्या बैठकीत पत्रकारांच्या विमा योजना, पेन्शन योजना आणि डिजिटल मीडिया पत्रकारांच्या मान्यतेसाठी विशेष धोरण तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पत्रकारांचे हक्क अबाधित राहण्यासाठी आणि त्यांना सामाजिक सुरक्षा मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शासन दरबारी ठोस मागण्या करेल, असे पत्रकार संघाचे सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले.

सत्कार समारंभात महाराष्ट्राच्या परंपरेचे दर्शन,

नूतन कार्यकारिणीच्या सत्कार सोहळ्यात पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी साईबाबांची मूर्ती, शाल, पुष्पगुच्छ, डायरी, बॅग आणि मिठाई देण्यात आली. विशेष म्हणजे, पारंपरिक खारीक-खोबऱ्याच्या हाराने सन्मान करून महाराष्ट्राच्या संस्कृतीशी नाळ जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित,

या कार्यक्रमाला राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार हेमंत जोशी, संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, ऑल इंडिया जनरल महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रणधीर कांबळे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमणी, सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

पत्रकार संघाच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचे निर्णय,

१. पत्रकारांसाठी कायदेशीर मदत केंद्र सुरू होणार पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये न्याय मिळावा, यासाठी पत्रकार कायदेशीर मदत केंद्र सुरू करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. २. ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे ग्रामीण भागातील पत्रकारांना प्रशिक्षित करण्यासाठी जिल्हानिहाय विशेष कार्यशाळा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ३. पत्रकार संरक्षण कायदा आणण्यासाठी सरकारवर दबाव पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र कायदा लागू करण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करण्याचे ठरले आहे. ४. पेन्शन आणि विमा योजना लागू करणे. पत्रकारांसाठी पेन्शन आणि विमा योजना सुरू करण्यासाठी सरकारकडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीची यादी राष्ट्रीय अध्यक्ष: अशोक वानखेडे

संस्थापक अध्यक्ष: संजय भोकरे प्रदेशाध्यक्ष: गोविंद वाकडे कार्याध्यक्ष: निलेश सोमणी प्रदेश उपाध्यक्ष: अशोक देडे, किशोर रायसाकडा, डॉ. अभय कुमार दांडगे, नितीन शिंदे, महेश पानसे इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रदेशाध्यक्ष: अतुल परदेशी सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष: सिद्धार्थ भोकरे पत्रकार हल्ला विरोधी समिती प्रमुख: किशोर पाटील मंत्रालय संपर्कप्रमुख: नितीन जाधव संघाचे प्रवक्ते: रमेश डोंगरे विभागीय अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य: महाराष्ट्रभरातील जिल्हाध्यक्ष व मान्यवर पत्रकार

पत्रकार संघटनांची एकजूट गरजेची - संजय भोकरे

कार्यक्रमात बोलताना संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांनी सांगितले, पत्रकार संघटनांनी एकत्र येऊन सरकारवर दबाव वाढवला तरच पत्रकारांच्या हक्कांसाठी ठोस निर्णय घेतले जातील. पत्रकारांनी समाजहितासाठी निर्भय आणि निःपक्षपाती भूमिका घेतली पाहिजे.

राज्य सरकारकडे पत्रकारांच्या मागण्यांसाठी पाठपुरावा करू - निलेश सोमानी

प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी यांनी पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि कल्याणकारी योजनांसाठी राज्य सरकारकडे ठोस पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले, पत्रकारांच्या सुरक्षा, विमा योजना, पेन्शन आणि अन्य मागण्यांसाठी संघटना सरकारदरबारी पाठपुरावा करेल. पत्रकारांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी संघटना कायम त्यांच्या पाठीशी राहील.

पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटना कटिबद्ध - डॉ. विश्वासराव आरोटे

पत्रकार संघटनेच्या वतीने बोलताना डॉ. विश्वास आरोटे यांनी स्पष्ट केले की, पत्रकार सुरक्षेसाठी ठोस धोरण राबवावे, पेन्शन योजना लागू करावी आणि पत्रकारांसाठी विशेष विमा योजना आणावी यासाठी आम्ही सरकारकडे लवकरच ठोस मागणी करणार आहोत.

संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा,

या सोहळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नव्या नेतृत्वाने पत्रकारांसाठी सुरक्षाविषयक उपाययोजना, हक्कांसाठी लढा आणि पत्रकारितेच्या दर्जेदार भविष्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा निर्धार व्यक्त केला. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीने पत्रकारांसाठी नव्या संधी, सुरक्षितता, विमा योजना, प्रशिक्षण आणि कायदेशीर मदतीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. हा निर्णय राज्यातील पत्रकारांसाठी नव्या युगाची सुरुवात ठरेल.

# कारंजा येथे विदर्भ राज्य आंदोलन समितीची वाशिम जिल्हा शाखेची सभा कारंजा लाड

## विदर्भ राज्य आंदोलन समिती वाशिम जिल्हा शाखेचे विविध विषयावरील सभा

कारंजा तालुका प्रतिनिधी - येथील विश्रामगृह बुधवार दिनांक १६ रोजी समितीचे प्रदेशाध्यक्ष अँड वामनराव चटप यांच्या अध्यक्षतेखाली व पश्चिम विदर्भ प्रमुख माजी प्राचार्य पि. आर राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या विषय पुस्तके नुसार विदर्भाच्या एकंदरीत समस्या व त्यावरील उपाय योजना बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विदर्भातील उच्च शिक्षण क्षेत्रात मागील १५ वर्षापासून शिक्षक भरती व इतर शासकीय नोकर भरती झालेली नसल्याने शाळा महाविद्यालय मोडकळीस आलेली आहेत. शेतकरी व शेतमजूर कुटुंबातील उच्चशिक्षित मुले बेरोजगारीच्या खाईत लोटल्या गेलेली आहेत. अत्यंत तुटपुंजा वेतनावर तासिका व कंत्राटी तत्त्वावर त्यांच्या सेवा संस्था चालक सरकारी धोरणानुसार अक्षरशा मजुराप्रमाणे घेत आहेत. हा बेरोजगार उच्चशिक्षित वर्ग शेतकऱ्यांच्या पावलावर पाऊल टाकून आत्महत्येसाठी प्रवृत्त होत आहे. सरकारद्वारे त्वरित उपाययोजना न केल्यास शाळा महाविद्यालय पूर्णता मोडकळीस तर येतीलच सोबतच हा शिक्षित बेरोजगार वर्ग कणायुक्त दयनीय अवस्थेत जीवन संपवण्यासाठी आत्महत्येच्या



उंबरठावर आलेला आहे. विदर्भातील बेरोजगारीचा ज्वलंत मुद्दा या सभेत प्रामुख्याने जनतेच्या केंद्रस्थानी होता. या विषयावर अधिक मंथन व्हावे म्हणून येत्या २५ मे रोजी अमरावती येथे कंत्राटी व तासिका तत्त्वावर कार्यरत शिक्षक आणि ग्राम पातळीवर काम करणारे सरपंच यांचा मेळावा आयोजित करण्यात येणार असल्याचे सुतोवाच प्राध्यापक बी आर राजपूत यांनी उपस्थितांसमोर केले. या मेळाव्याच्या आयोजनाची पूर्वतयारी म्हणून अँड वामनराव चटप यांच्या नेतृत्वात पश्चिम विदर्भाचा दौरा १६ ते २१ एप्रिल पर्यंत आयोजित करण्यात आला असून त्याची सुरुवात आज वाशिम जिल्ह्याच्या कारंजा येथील सभेतून झाली आहे. या सभेमध्ये वाशिम जिल्हाध्यक्ष राजु अवताडे उपाध्यक्ष डॉ. रमेश चंदनशिव कोर कमिटी सदस्य ओमप्रकाश तापडिया, भारत भगत, पत्रकार नाना देवळे, विजय भड,विनोद गणवीर,अशोक मानकर, नारायण आव्हाळे, देविदास जोगे, संजय थोरात, अरुण चव्हाण,कीरण ठाकरे,भारत भगत, आर,सी.मुकवाणे, प्रकाश भगत, गजानन अमदाबादकर,रोमीय लाठीया, सचिन राठोड, भास्कर डुकरे, अशोक मनवर, देविदास काळबांडे, दारासिंग चव्हाण, अरविंद राठोड, प्रदीप वानखडे, विलास डोंगरे तसेच वाशिम जिल्ह्यातील विविध तालुक्यातून आलेले विदर्भवादी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेला संबंधित करताना अँड वामनराव चटप यांनी विदर्भाच्या सिंचन बेरोजगारी शेती वीज खनिज अशा सर्व क्षेत्रातील शोषण व अनुशेषावर केवळ एकच पर्याय आहे तो म्हणजे वेगळा विदर्भ असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू अवताडे यांनी केले. यशस्वीतेसाठी जिल्हा कार्यकारणीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# क्रांतिसूर्य म.जोतीराव फुले आणि प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**रिसोड : सुभेदार - रामजी आंबेडकर ट्रस्ट, संयुक्त जयंती उत्सव समिती तथा एकता नगर मधील सर्व नागरिकांच्या वतीने संबोधी बुद्ध विहाराच्या भव्य प्रांगणामध्ये क्रांतिसूर्य म.जोतीराव फुले आणि प्रज्ञासूर्य विश्वरत्न - डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात व भव्यदिव्य स्वरूपात साजरी करण्यात आली.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी - विदर्भवादी नेते तथा सामाजिक विचारवंत - दत्तरावजी धांडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार - अमित भाऊ झनक , ठाणेदार- रामेश्वर चव्हाण, प्रा.डॉ. अतुल खोटे, ज्येष्ठ पत्रकार- सतीश मांदळे, पत्रकार- शितल धांडे, पत्रकार- रविंद्र अंभोरे , प्राचार्य- प्रतापराव नायक, भागवतराव गाभणे, मंचकराव देशमुख, बबनराव गारडे ,अरुण भाऊ क्षीरसागर, आगार प्रमुख- निलेश बोदडे ,पोलीस निरीक्षक - रमेशराव मोरे ,डॉ. कुलदीप देशमुख, गजानन निखाते, विनोदराव बांगर , फैय्याज भाई अकबर भाई , भगवानराव जाधव, प्राचार्य- डॉ. विजयराव तुरुकमाने, प्रा.डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर ,प्रा.डॉ.जयंतराव मेश्राम ,मेजर- रामभाऊ अंभोरे , मंदाताई धांडे, मंदाताई वाघमारे , आदी मान्यवर उपस्थित होते. प्रथमतः सर्व मान्यवरांच्या शुभ हस्ते महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करून बुद्ध वंदना घेण्यात आली आणि महामानवांना अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमात बोलताना आमदार- अमित भाऊ झनक म्हणाले की , महात्मा जोतीराव फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श , प्रेरणादायी विचार आणि त्यांची विद्वत्ता संपूर्ण जगाने स्वीकारलेली आहे, आणि त्यांचे विचार संपूर्ण मानव जातीसाठी कल्याणासाठी उपयुक्त आहेत, असे सांगितले . तर ठाणेदार- रामेश्वर चव्हाण यांनी उच्च शिक्षण घ्या आणि बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा , असे प्रतिपादन केले . तर प्रमुख वक्ते - प्रा.डॉ. अतुल खोटे यांनी महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे महापुरुष या जगात निर्माण झाले म्हणूनच उपेक्षित असलेला हा बहुजन समाज अत्यंत सन्मानाने जीवन जगत आहे , ही पुण्याई या महामानवांची आहे , असे मोलाचे मार्गदर्शन केले ,

तर मंचावरील सर्व मान्यवरांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवन कार्याचा समर्पक शब्दात गुण गौरव केला. तसेच विदर्भवादी नेते तथा सामाजिक विचारवंत - दत्तरावजी धांडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दोन्ही महापुरुषांच्या क्रांतिकारी कार्याचा उचित शब्दात गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या महान कार्याची महती पटवून दिली , दत्तराव धांडे यांचा वाढदिवस असल्यामुळे त्यांचा उचित सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या . सदर कार्यक्रमाची प्रस्तावना - प्रा. दादाराव अंभोरे यांनी केली ,आणि अत्यंत बहारदार शैलीमध्ये कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - प्रा. जयंतराव हेलोडे यांनी केले तर आभार प्रा. अलंकार खैरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमानंतर लगेच स्नेह-भोजनाचा कार्यक्रम सुनियोजित पणे पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. दामोधर धांडे, रमेशराव कळासरे, ॲड .दशरथ मोरे, मेजर- कैलास कळासरे ,मेजर- कपिल वाठोरे, सुनिल गवई, राजेंद्र मोरे जयपूरकर, कैलास धांडे, विश्वासराव जमधाडे, डॉ. भीमराव धांडे , समाधान जावळे, जनार्धन वाकोडे, किसनराव कळासरे , प्रा. नंदकिशोर खैरे, प्रा. श्रीराम कळासरे, प्रा. शालिग्राम पठाडे , मधुकर जमधाडे, विनोद इंगोले , अश्विन तुरुकमाने, ग्यानबा खैरे, उत्तमराव धांडे , गजानन खिल्लारे, शंकर गायकवाड मनोहर साळवे ,गजानन खिल्लारे ,सिद्धार्थ लेमाडे, भरत तुरुकमाने ,रामदास अंभोरे ,प्रा. उत्तमराव अंभोरे द्वारकाबाई धांडे , यशोदाबाई वाकोडे ,वैशालीताई धांडे इंदुताई तुरुकमाने, प्रा. लताताई हेलोडे ,लताताई धांडे ,मंदाताई कळासरे, डॉक्टर- पल्लवीताई धांडे अंतकलाबाई जाधव, मालाताई गवई ,शीलाताई धांडे ,आनंदीबाई पंडित आदींनी मोलाचे सहकार्य केले आणि एकता नगर मधील बहुसंख्य नागरिकांची उपस्थिती लाभली आणि संध्याकाळी सुप्रसिद्ध भीमशाहीर- दिनकर लोणकर यांचा समाज प्रबोधन पर बहारदार संगीतमय बुद्ध व भीम गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला , सर्व कार्यक्रम अत्यंत शांततेत व उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाले.

## साहित्यिक पोतदार यांच्या हस्ते पूर्ण अपूर्ण ग्रंथाचे प्रकाशन



दिलीप नाझरे यांनी लिहिलेल्या पूर्ण - अपूर्ण या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक बबन पोतदार यांच्या हस्ते बुधवारी पुण्यात पार पडले. या वेळी बोलताना पोतदार म्हणाले, की काळीज पोखरून टाकणाऱ्या घटना आजूबाजूला घडतात. समाजाचे विद्रुपीकरण होत असताना साहित्यिकांनी गप्प बसून चालणार नाही. गढूळ होत चाललेले वातावरण निवळून शुद्ध करण्याची ताकद लेखनीत असते. पुस्तकाची निर्मिती वेदनेतून झाली, असे मनोगत लेखकांनी मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी उद्योजक श्रीकांत गिरमे होते. प्रास्ताविक कबीर पटेल, सूत्रसंचालन विलास बाबर यांनी, तर आभार अशोक नाझरे यांनी मानले.

■ पुण्यात कार्यक्रम
■ दिलीप नाझरे यांचे लिखाण

## रिसोड पोलीसांची विशेष कामगिरी

**रिसोड** : पोलीसांनी मागील एक ते दिड महिन्यात अपहरण, मिसींग, बलात्कार व पोक्सो यासारख्या गंभीर गुन्हयांची उकल करून गुन्हयातील पिडीतेस न्याय देवून आरोपींना अटक करून कायदेशिर कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच मोटार सायकल, मोबाईल चोरींच्या गुन्हयातील अज्ञात आरोपींचा शोध घेवून चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या प्रकरणाची जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम यांनी दखल घेवून १७ एप्रिल रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथे जिल्हयातील सर्व ठाणेदार



यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन रिसोड येथील अधिकारी व अंमलदारांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार केला आहे. पोलीस अधीक्षक अनुज तारे (घ्इए) व मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड याचे हस्ते विशेष कामगिरी करणारे मा. सहायक पोलीस अधीक्षक, वाशिम नवदिप अग्रवाल पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक शिवचरण डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर नागरे, पोलीस हवालदार रतन बावस्कर, मंगेश मालवे, पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, प्रविण ढवणे, हेमंत सरकटे, विश्वास चव्हाण, रूपेश मस्के, साहेबराव मुकाडे यांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार केला आहे. ता.प्र

## नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या अध्यक्षांना हटविण्याचे अधिकार आता सदस्यानांच! त्यासाठी अधिनियमात सुधारणा करणार

मुंबई - राज्यातील नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचे अधिकार सदस्यांना देण्यात येणार आहेत. त्याबाबतच्या तरतुदींस मान्यता देऊन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

यापुर्वी नगराध्यक्षांना पदावरुन दूर करण्याच्या प्रक्रियेत निवडून आलेल्या सदस्यापैकी पन्नास टक्के सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर शासनस्तरावर कार्यवाही अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कार्यवाही केली जात असे. त्याऐवजी आता अध्यक्षांना पदावरून हटवण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यांना अधिकार दिले जाणार आहेत. त्यानुसार निवडून आलेल्या सदस्य संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव पाठवला जाईल. ज्यावर जिल्हाधिकाऱ्यांना दहा दिवसांच्या आत विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल. याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्यास तसेच त्यासाठीचा अध्यादेश काढण्यास मान्यता देण्यात आली.

## भा.मा. कन्या शाळेत भिम जयंती उत्साहात साजरी

रिसोड : भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक १४ एप्रिल रोजी माननीय प्राचार्या मंजुषा सु.देशमुख यांनी विश्वरत्न बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या ज्ञानाच्या अथांग महासागराला १३४ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेला मालार्पण करत पूजन करून



अभिवादन केले.

या आधुनिक भारताच्या शिल्पकारांनी आम्हाला काय काय दिले हे सांगत असताना प्राचार्या मंजुषा सू. देशमुख मॅडम यांनी आपले विचार व्यक्त करताना कामाचे बारा तासावरून आठ तास केले, कामगार राज्य विमा, कामगाराला मिळणाऱ्या प्राथमिक सेवा, कामगार संघटनेची मान्यता दिली, भार पगारी सुट्ट्या , महागाई भत्ता , कायदेशीर संपाचा अधिकार , आरोग्य विमा, कामगार कल्याण निधी, स्त्री-पुरुष समानता, मुलींना समान अधिकार, महिला कामगार संरक्षण कायदा, मतदानाचा अधिकार, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संपूर्ण राष्ट्राला एकसंघ बांधणारे भारतीय संविधान ही एक सर्वात मोठी देन होय. अशा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला कृतीला आणि विचाराला त्रिवार अभिवादन करत आपले मत व्यक्त केले. या जयंती कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. श.प्र.